# जाहिर सूचना.

ठाणे महानगरपालिकेतील नागरिकांना या जाहिर सूचनेद्वारे कळविण्यांत येते की,

## प्रकरण तीन

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ यामध्ये सुधारणा.

## प्रकरण चार अ.

विनिर्दीष्ट माहिती प्रकट करणे.

६०.अ (१) महानगरपालिका, आपले सर्व अभिलेखक, अशा रितीने व अशा नमुन्यात यथोचितरित्या विनिर्दिष्ट माहिती तालिकाबध्द करील व त्याची निर्देश सूची तयार करील जेणेकरुन, पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेली माहिती महानगरपालिकेला प्रकट करता येईल.

सदर नियमानुसार ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा, स्थायी समिती, विशेष समित्या यांचे विषयपत्रिका, इतिवृत्तांत, ठराव आपल्या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ नियम (१) न अन्वये पाहता येईल.

तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ (फी आणि खर्च विनियमन) मधील ४ अ नुसार योग्य ती रक्कम आकारुन त्याच्या प्रती विकत घेता येतील.

**(प्र.म.निंबर्गी)**
सचिव/उपआयुक्त,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.प्रति,